दिनांक : ०८.०१.२०२४ रोजी अद्ययावत

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वये प्रकाशनासाठी तपशील

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग

## कलम ४ (१) (ब) (१)

**कार्यालयाचे नाव - महाराष्ट्र राज्य माहिती आयोग**

**पत्ता - १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर, मुंबई – ४०० ०३२.**

**राज्याचे माहिती आयुक्त:-**

**१) राज्य मुख्य माहिती आयुक्त (रा.मु.मा.आ.) - श्री समीर सहाय (अति. कार्यभार)**

**२) राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई - श्री समीर सहाय (अति. कार्यभार)**

**३) राज्य माहिती आयुक्त, कोकण - श्री. भूपेंद्र गुरव (अति. कार्यभार)**

**४) राज्य माहिती आयुक्त, पुणे - श्री. समीर सहाय**

**५) राज्य माहिती आयुक्त, नाशिक – श्री. भूपेंद्र गुरव**

**६) राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद - श्री. समीर सहाय (अति. कार्यभार)**

**७) राज्य माहिती आयुक्त, अमरावती - श्री. राहुल पांडे (अति. कार्यभार)**

**८) राज्य माहिती आयुक्त, नागपूर - श्री राहुल पांडे**

**कार्ये :-** ११ ऑक्टोबर २००५ च्या राजपत्रित अधिसूचनेद्वारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १५ च्या उपकलम (१) अन्वये राज्य माहिती आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. राज्य माहिती आयोगाचे काम या कायद्यांतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करणे आणि सोपविलेली कामे पार पाडणे हे आहे.

## राज्य माहिती आयोगात यांचा समावेश आहे :-

**(अ) राज्याचे मुख्य माहिती आयुक्त ; आणि**

**(ब) राज्य माहिती आयुक्त.**

राज्य माहिती आयोगाच्या कामकाजाचे सर्वसाधारण देखरेख, मार्गदर्शन व व्यवस्थापन राज्याच्या मुख्य माहिती आयुक्तांकडे असते, ज्याला राज्य माहिती आयुक्तांची मदत असते आणि माहिती अधिकार कायद्यांतर्गत इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या निर्देशांना अधीन न राहता सर्व अधिकाराचा वापर करतात किंवा अशी सर्व कृत्ये व कामे स्वायत्तपणे करतात.

राज्याचे मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांना या अधिनियमांतर्गत त्यांचे कार्य कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक तेवढे अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देण्याचे आदेश राज्य सरकारला देण्यात आले असून या अधिनियमाच्या उद्देशाने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांचे देय वेतन व भत्ते व सेवेच्या अटी व शर्ती विहित केल्याप्रमाणे असतील. राज्य मुख्य माहिती आयोग कार्यालयासाठी २० पदे आणि खंडपीठांसाठी १८ पदे शासनाने मंजूर केली आहेत.

**उद्दिष्टे** — माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये दिलेल्या आदेशाची पूर्तता करणे.

प्रदान केलेल्या सेवांचा / कर्तव्यांचा तपशील - माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार अपीलकर्त्यांच्या तक्रारी आणि अपील प्राप्त करण्याचे व अपिलावर निर्णय देण्याचे कामकाज आयोगावर सोपविण्यात आले आहे.

**भौतिक मालमत्ता** — राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेली कार्यालय इमारत.

# कलम ४ (१) (ब) (२)

**अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये:-**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार व कर्तव्ये |
|---|---|---|
| १. | राज्य मुख्य माहिती आयुक्त | देखरेख व मार्गदर्शनसह राज्य माहिती आयोगाचे एकंदर व्यवस्थापन. अपील आणि तक्रारींवर सुनावणी घेऊन निकाल देणे. इतर राज्य माहिती आयुक्तांच्या समन्वयाने राज्य सरकारला शिफारशींसह वार्षिक अहवाल सादर करणे. |
| २. | सचिव, राज्य मुख्य माहिती आयोग | मुख्य राज्य माहिती आयुक्तांना विविध कामांमध्ये व मुख्य राज्य माहिती आयुक्तांच्या निर्देशानुसार मदत करणे. राज्य माहिती आयोग कार्यालय, मुंबई येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून काम करणे. राज्य माहिती आयोग आणि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ शी संबंधित बाबींसाठी विविध शासकीय विभागांशी समन्वय साधणे. |
| ३. | कक्ष अधिकारी | माहिती अधिकार कायद्यासंदर्भातील निर्णय व सूचनांचा पाठपुरावा करणे व प्रकरणे मांडणे. कार्यालयीन प्रशासन, आर्थिक बाबी इ. संदर्भात वेळोवेळी नेमून देण्यात आलेली कामे करणे. |
| ४. | सहा. कक्ष अधिकारी | कामाच्या वाटपानुसार माहिती अधिकार कायद्याची प्रकरणे/ इतर कागदपत्रे व पत्रव्यवहार प्राप्त करणे व त्याची नोंद ठेवणे.<br>दस्तऐवज/ पत्रव्यवहार व्यवस्थित आणि अधिकाऱ्यांच्या अधीन राहून सादर करणे. वरिष्ठांच्या नस्तीसंबंधित सूचनांचा पाठपुरावा करणे. |
| ५. | लघुलेखक | द्वितीय अपील सुनावणी प्रसंगी श्रृतलेखन/टंकलेखन करणे व सुनावणी आदेश तयार करुन मा. राज्य मुख्य माहिती आयुक्तांसमोर सादर करणे. |
| ६. | लिपिक-टंकलेखक | १. आवक लिपिक -अर्जदारांची द्वितीय अपील व तक्रारींच्या संदर्भातील पत्रव्यवहार प्राप्त करणे. अभ्यागतांना मार्गदर्शन करणे व आवश्यक तेथे अधिक माहितीसाठी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याला भेटण्यास पाठविणे.<br>२. जावक लिपिक – राज्य माहिती आयोगाकडून पत्रव्यवहार योग्य नोंदीनंतर पाठविणे. पूर्ण झालेली प्रकरणे क्रमवार आणि सुरक्षितपणे ठेवणे.<br>३. इतर लिपिकांनी कार्यालयीन आवश्यकतेनुसार नेमून दिलेली इतर कामे करणे. |

## कलम ४ (१) (ब) (३)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अपील व तक्रारींमध्ये अवलंबिलेली कार्यपद्धती:-**

माहिती अधिकार कायद्याच्या कलम १९ अन्वये प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशाविरुद्ध आयोगाला द्वितीय अपील प्राप्त होते. हे अपील राज्याच्या मुख्य माहिती आयुक्तांसमोर ठेवले जाते जे सुनावणीनंतर अपीलावर निर्णय देतात. अर्जदार, राज्य जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपील अधिकारी यांना द्वितीय अपिलाच्या सुनावणीसाठी बोलावले जाते आणि या प्रकरणाचा निकाल देताना राज्याचे मुख्य माहिती आयुक्त/ राज्य माहिती आयुक्त त्यांचे म्हणणे विचारात घेतात.

माहिती अधिकार कायद्याच्या कलम १८ अन्वये ही आयोगाकडे तक्रारी येतात. ही तक्रार मुख्य माहिती आयुक्तांकडे ठेवली जाते, जे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकरणाकडून अहवाल मागवू शकतात, सुनावणी निश्चित करू शकतात किंवा या प्रकरणावर इतर योग्य निर्णय घेऊ शकतात.

## कलम ४ (१) (ब) (४)

**राज्य माहिती आयोगातील कामकाज पार पाडण्यासाठी निश्चित केलेले निकष:-**

आयोगातील सर्व कर्तव्ये व कामकाज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये पार पाडली जातात.

कलम ४ (१) (ब) (५) अन्वये :- राज्य माहिती आयोग कार्यालयात आपले कार्य पार पाडण्यासाठी असलेले नियम/नियमन/सूचना/नियमावली/नोंदी यांची यादी :-

१. माहितीचा अधिकार कायदा (आरटीआय) २००५

२. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५.

३. पहिला वार्षिक अहवाल (१२.१०.२००५ ते ३१.१२.२००६)

४. दुसरा वार्षिक अहवाल (०१.०१.२००७ ते ३१.१२.२००७)

५. तिसरा वार्षिक अहवाल (०१.०१.२००८ ते ३१.१२.२००८)

६. चौथा वार्षिक अहवाल (०१.०१.२००९ ते ३१.१२.२००९)

७. पाचवा वार्षिक अहवाल (०१.०१.२०१० ते ३१.१२.२०१०)

८. सहावा वार्षिक अहवाल (०१.०१.२०११ ते ३१.१२.२०११)

९. सातवा वार्षिक अहवाल (०१.०१.२०१२ ते ३१.१२.२०१२)

१०.आठवा वार्षिक अहवाल (०१.०१.२०१३ ते ३१.१२.२०१३)

११. नववा वार्षिक अहवाल (०१.०१.२०१४ ते ३१.१२.२०१४)

१२. दहावा वार्षिक अहवाल (०१.०१.२०१५ ते ३१.१२.२०१५)

१३. अकरावा वार्षिक अहवाल (०१.०१.२०१६ ते ३१.१२.२०१६)

१४. बारावा वार्षिक अहवाल (०१.०१.२०१७ ते ३१.१२.२०१७)

१५. तेरावा वार्षिक अहवाल (०१.०१.२०१८ ते ३१.१२.२०१८)

१६. चौदावा वार्षिक अहवाल (०१.०१.२०१९ ते ३१.१२.२०१९)

१७. पंधरावा वार्षिक अहवाल (०१.०१.२०२० ते ३१.१२.२०२०)

| अ. क्र. | विषय | डॉक्युमेंट फाईल/मस्टर/रजिस्टर/व्हाउचर इ. प्रकार. | दस्तऐवजातील शीर्षक/प्रकाराचा तपशील |
|---|---|---|---|
| १. | अपिले | नस्ती | माहिती अधिकार कायद्याचे कलम १९. |
| २. | तक्रारी | नस्ती | माहिती अधिकार कायद्याचे कलम १८. |
| ३. | सामान्य / संकीर्ण (General/ Miscellaneous) | नस्ती/फोल्डर्स | माहिती अधिकार किंवा विविध माहिती अधिकार व्यतिरिक्त प्रकरणांशी संबंधित सामान्य बाबी. |
| ४. | प्रशासन | नस्ती | आयोगातील प्रशासकीय बाबींशी संबंधित. |
| ५. | वार्षिक अहवाल | नस्ती | कलम २५ नुसार तयार करण्यात येणाऱ्या वार्षिक अहवालासाठी मंत्रालयीन विभागांनी व खंडपीठांनी सादर केलेले साहित्य. |

## कलम ४(१) (ब) (६)

मुख्य माहिती आयोगाच्या दिनांक १६.०६.२०२२ च्या परिपत्रकानुसार द्वितीय अपीलाचे आदेश व संबंधित माहिती अधिकार अर्ज स्कॅन करून कायमस्वरूपी जतन केला जातो. दंडाची प्रकरणे "क" वर्ग (५ वर्षे) म्हणून जतन केली जातात.

इतर संकीर्ण प्रकरणे १ वर्षासाठी जतन केली जातात. दिनांक १६.०६.२०२२ च्या परिपत्रकाची प्रत संकेतस्थळावर म्हणजेच www.sic.maharashtra.gov.in (अन्य जोडण्या → महत्वाची पत्रे) वर प्रदर्शित केली आहे.

## कलम ४(१) (ब) (७)

आयोगाला विविध संस्था/व्यक्तींकडून वेळोवेळी सूचना प्राप्त होतात. त्यांची तपासणी करून आवश्यक तिथे पुढील कार्यवाही केली जाते.

## कलम ४(१) (ब) (८)

मुख्य माहिती आयुक्तांच्या इतर सर्व राज्य माहिती आयुक्तांशी झालेल्या बैठकांचे इतिवृत्त संकेतस्थळावर म्हणजेच www.sic.maharashtra.gov.in (अन्य जोडण्या → महत्त्वाची पत्रे) वर प्रदर्शित केले जाते.

## कलम ४(१) (ब) (९)

कलम ४ (१) (ब) (९) अन्वये राज्य माहिती आयुक्तांकडील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निर्देशिका:-

| अ.क्र. | नाव व पदनाम | दूरध्वनी क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|
| १. | श्री. समीर सहाय, राज्य मुख्य माहिती आयुक्त | २२८५६०७८ | cic.mumbai@maharashtra.gov.in |
| २. | श्रीम. सविता जावळे, सचिव | २२०४९१८४ | msic.sec@maharashtra.gov.in |
| ३. | श्रीम. शिल्पा देशमुख, अवर सचिव | २२०४९३९० | msic.do1@maharashtra.gov.in<br>msic.do2@mahrashtra.gov.in |
| ४. | श्री. अभय भंडारी, कक्ष अधिकारी | २२०४९३९० | msic.do1@maharashtra.gov.in<br>msic.do2@mahrashtra.gov.in |

# कलम ४(१) (ब) (१०)

**कलम ४ (१) (ब) (१०) अन्वये अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मानधनाचा तपशील.**

माहिती चा अधिकार अधिनियम २००५ नुसार देय वेतन व भत्ते व सेवेच्या इतर अटी व शर्ती –

(अ) राज्याचे मुख्य माहिती आयुक्त हे भारत सरकारच्या निवडणूक आयुक्तांप्रमाणेच असतील.

परंतु मुख्य माहिती आयुक्त किंवा माहिती आयुक्त हा त्याच्या नियुक्तीच्या वेळी भारत सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या अधीन असलेल्या कोणत्याही पुर्वोक्त सेवेच्या संबंधात विकलांगता किंवा जखम निवृत्तीवेतनाव्यतिरिक्त अन्य निवृत्तीवेतन घेत असेल, तर मुख्य माहिती आयुक्त म्हणून असलेल्या सेवेच्या संबंधातील त्याच्या वेतनातून, सेवानिवृत्ती-उपदानाच्या रकमेएवढे निवृत्तीवेतन वगळून अंशराशिकृत निवृत्तीवेतनाचा कोणताही भाग व इतर स्वरुपातील सेवानिवृत्ती लाभ यांची मिळून होणारी निवृत्तीवेतनाची एकूण रक्कम कमी करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, मुख्य माहिती आयुक्त किंवा माहिती आयुक्तास, त्याच्या नियुक्तीच्या वेळी, कोणत्याही केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये स्थापन केलेल्या महामंडळात किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील शासकीय कंपनीत केलेल्या आधीच्या कोणत्याही सेवेच्या संबंधातील सेवानिवृत्ती-लाभ मिळत असतील तर, मुख्य माहिती आयुक्त किंवा माहिती आयुक्त म्हणून केलेल्या सेवेच्या संबंधातील त्याच्या वेतनातून सेवा निवृत्ती लाभांइतकी निवृत्ती वंतनाची रक्कत कमी करण्यात येईल.

परंतु तसेच, मुख्य माहिती आयुक्ताचे व माहिती आयुक्तांचे वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती यांमध्ये, त्यांच्या नियुक्तीनंतर, त्यांना अहितकारक असतील असे बदल करण्यात येणार नाहीत.

**राज्य माहिती आयोगातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतनमान पुढीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | पदनाम | पदाची वेतनश्रेणी (सातवा वेतन आयोग) |
|---|---|---|
| १. | मुख्य माहिती आयुक्त | २,२५,००० (निश्चित) |
| २. | सचिव (एस-२७) | ३७४००-६७००० ग्रेड पे ८७०० |
| ३. | अवर सचिव (एस-२३) | १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० |
| ४. | कक्ष अधिकारी (एस-१७) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४८०० |
| ५. | सहायक (विधि) (एस-१५) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० |
| ६. | लघुलेखक (उच्च श्रेणी) (एस-१५) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० |
| ७. | लघुलेखक (निम्न श्रेणी) (एस-१४) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० |
| ८. | सहा. कक्ष अधिकारी (एस-१४) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० |
| ९. | लिपिक-टंकलेखक (एस-६) | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |

| | | |
|---|---|---|
| १०. | वाहन चालक (एस-६) | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |
| ११. | शिपाई (एस-१) | ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० |

(टीप – शा. नि. दिनांक २१.०६.२०२३ अन्वये लघु लेखक (उच्च/निम्न श्रेणी), लिपिक-टंकलेखक, वाहन चालक व शिपाई ही पदे रिक्त झाल्यानंतर बाह्य यंत्रणेद्वारे भरण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तथापि, सदर शासन निर्णयाबाबत राज्य शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात येत आहे.)

**राज्य माहिती आयोग, मुंबई येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा तपशील:-**

| अ.क्र. | नाव | पदनाम | एकूण वेतन |
|---|---|---|---|
| १. | श्री. समीर सहाय | मुख्य माहिती आयुक्त | २,२५,०००/- |
| २. | श्रीम. सविता जावळे | सचिव | १,१७,७२४/- |
| ३. | श्रीम. शिल्पा देशमुख | अवर सचिव | १,३२,९६४/- |
| ४. | रिक्त | अवर सचिव (विधि) | -- |
| ५. | श्री. अभय भंडारी | कक्ष अधिकारी | १,१४,५४०/- |
| ६. | श्रीम. ज्योत्स्ना शिंदे | स्वीय सहायक | १,५९,००९/- |
| ७. | श्रीम. सायली सावंत | सहा. कक्ष अधिकारी | ९६,२१९/- |
| ८. | श्री. प्रसन्न पाध्ये | विवक्षित कामकाजासाठी कंत्राटी तत्वावर | ४५,०००/- |
| ९. | रिक्त | सहा. कक्ष अधिकारी (विधि) | -- |
| १०. | रिक्त | सहा. कक्ष अधिकारी | -- |
| ११. | श्रीम. मधुरा केणी | लिपिक-टंकलेखक (उसनवारीने) | ८७,१५३/- |
| १२. | श्रीम. प्रगती सोनावणे | लघु लेखक (नि. श्रे.) (कंत्राटी) | ३३,४९५/- |
| १३. | श्रीम. अश्विनी मयेकर | लघु लेखक (नि. श्रे.) (कंत्राटी) | ३३,४९५/- |
| १४. | श्री. प्रथमेश गुरव | लिपिक-टंकलेखक (कंत्राटी) | १९,६३५/- |
| १५. | रिक्त | लिपिक-टंकलेखक | -- |
| १६ | रिक्त | लिपिक-टंकलेखक | -- |
| १७. | रिक्त | वाहन चालक | -- |
| १८. | श्री. उमेश जाधव | शिपाई (कंत्राटी) | १५,०१५/- |
| १९. | श्री. प्रल्हाद जोशी | शिपाई (कंत्राटी) | १५,०१५/- |
| २०. | श्री. नरेश मुळीक | शिपाई (कंत्राटी) | १५,०१५/- |

## कलम ४(१) (ब) (११)

**चालू वर्षातील अंदाजपत्रकाचा तपशील पुढीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | Budget head description | Budget २०२३-२४ (in thousand) |
|---|---|---|
| १ | ०१ - वेतन | १,१५,५३४/- |
| २ | ०३ - अतिकालीक भत्ता | ३७/- |
| ३ | ०६ - दुरध्वनी, वीज व पाणी | २,०२०/- |
| ४ | १०- कंत्राटी सेवा | १९,०००/- |
| ५ | ११- देशांतर्गत प्रवास खर्च | २,८०१/- |
| ६ | १२- विदेश प्रवास खर्च | २१०/- |
| ७ | १३ - कार्यालयीन खर्च | १३,७६२/- |
| ८ | १४- भाडेपट्टी व कर | १,००६/- |
| ९ | १७ - संगणक खर्च | २,८९६/- |
| १० | २० - इतर प्रशासकीय खर्च | १९/- |
| ११ | २८ — व्यावसायिक सेवा | १,०००/- |
| १२ | ५१- मोटार वाहने | १,२७४/- |
| | **Total** | १५,९४,८९/- |

## कलम ४ (१) (ब) (१२)

कलम ४ (१) (ब) (१२) अन्वये आयोगाकडून अनुदान कार्यक्रमाच्या लाभार्थ्यांचा तपशील : लागू नाही.

## कलम ४ (१) (ब) (१३)

कलम ४ (१) (ब) (१३) अन्वये सवलत परवाने किंवा दिलेली अधिकृतता प्राप्तकर्त्यांच्या तपशीलांचा तपशील : निरंक.

## कलम ४ (१) (ब) (१४)

**कलम ४ (१) (ब) (१४) अन्वये मुख्य माहिती आयुक्त कार्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध माहितीचा तपशील:-**

| अ. क्र. | कागदपत्रांचा प्रकार | उप विषय | कोणत्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ठेवले आहे | पुनर्प्राप्तीची पद्धत |
|---|---|---|---|---|
| १. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ | - | संकेतस्थळावर पीडीएफ स्वरूपात | संकेतस्थळावर -अन्य जोडण्या शीर्षकाखाली माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ |
| २. | द्वितीय अपील आदेश | - | संकेतस्थळावर पीडीएफ स्वरूपात | संकेतस्थळावर निर्णय या शीर्षकाखाली |
| ३. | तक्रार आदेश | - | संकेतस्थळावर पीडीएफ स्वरूपात | संकेतस्थळावर तक्रारी या शीर्षकाखाली |

## कलम ४ (१) (ब) (१५)

राज्य माहिती आयोगाने ग्रंथालय किंवा वाचनालय उभारलेले नाही.

प्रत्येक सोमवारी दुपारी ३ ते ५ या वेळेत सर्व नागरिक उपलब्ध फायलींची तपासणी करण्यासाठी मुख्य माहिती आयुक्त कार्यालयात येऊ शकतात.

## कलम ४ (१) (ब) (१६)

**कलम ४ (१) (ब) (१६) अन्वये जनमाहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकरण:-**

**जनमाहिती अधिकारी :**

१) श्रीमती शिल्पा आर. देशमुख, अवर सचिव, (अपील, तक्रारी आणि अन्य कामकाज)

२) श्री. अभय भंडारी, कक्ष अधिकारी, (प्रशासन व आस्थापना बाबी, लेखा व अन्य कामकाज)

**प्रथम अपिलीय अधिकारी:**

श्रीमती सविता जावळे, सचिव.

## कलम ४ (१) (ब) (१७)

कलम ४(१) (ब) (१६) अन्वये आजतागायत काहीही विहित केलेले नाही.

**रिट पिटीशन ९९०/२०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या पालनाची सद्यस्थिती:-**

१. मा. मुख्य माहिती आयोगाच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.०८.२०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त संकेतस्थळावर म्हणजेच www.sic.maharashtra.gov.in (अन्य जोडण्या → महत्त्वाची पत्रे) येथे प्रदर्शित करण्यात आले आहे.
२. कलम ४ च्या देखरेखीसाठी सार्वजनिक प्राधिकरणांची यादी उपलब्ध करून देण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना लिहिलेले पत्र आणि त्यासंदर्भात राज्य सरकारकडून मागविण्यात आलेला अहवाल. (दिनांक 17.10.2023 च्या पत्राची प्रत संकेतस्थळावर म्हणजे www.sic.maharashtra.gov.in (अन्य जोडण्या → महत्त्वाची पत्रे.) वर प्रदर्शित केले आहे.
३. कलम ४ च्या अंमलबजावणीसाठी मा. मुख्य माहिती आयुक्तांनी दिनांक २२.१२.२०२३ रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना पाठविलेले शिफारस पत्र संकेतस्थळावर म्हणजेच www.sic.maharashtra.gov.in (अन्य जोडण्या → महत्वाची पत्रे.) वर प्रदर्शित केले आहे.

---